आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक १३ जुलै २०२५

ठळक बातम्या

- महाराष्ट्रात देशातील सर्वोत्तम सायबर न्यायसहायक प्रयोगशाळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागपूरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी प्रतिपादन.
- ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांच्यासह ४ मान्यवरांची राष्ट्रपतींकडून राज्यसभेवर नियुक्ती.
- प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणार.
- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास उद्या सुरु होणार.

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा

आधुनिक सायबर प्रयोग शाळांसह, मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात असून, तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता, येत्या काळात लोकाभिमुख आणि ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल असं प्रतिपादन मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूरात केलं. धंतोली परिसरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन आणि गृह विभागाच्या, तीन नवीन प्रकल्पांचं ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक, सायबर न्याय सहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली असल्याचं त्यांनी सांगितलं

.

*देशातली सगळ्यात आधुनिक अशा प्रकारची या ठिकाणी सायबर फॉरेन्सिकची व्यवस्था ही महाराष्ट्रामध्ये आपण तयार केलेली आहे. या ठिकाणी देशातली सगळ्यात आधुनिक सायबर लॅब ही आपण महाराष्ट्रामध्ये तयार केलेली आहे.*

*आज जी कॅपेबिलिटी महाराष्ट्राने तयार केलेली आहे, ती आता अन्य कुठल्याही राज्याकडे नाही. किंबहुना अनेक राज्यातले लोक आता आपल्या महाराष्ट्रामध्ये येऊन आपल्याला विनंती करतात की अशा प्रकारची लॅब आपण तयार करून द्या.*
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुन्ह्यांची सिद्धता होऊन, गुन्हेगारास शासन आणि पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची भूमिका महत्वाची ठरते. विकसित भारताच्या दिशेनं, मार्गक्रमण करतांना, गुन्हे सिद्धतेचे हे प्रमाण, **90** टक्क्यांपुढे घेऊन जावं लागेल. नागपूर इथल्या प्रादेशिक न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा ही अत्याधुनिक करण्याच्या दिशेनं पावलं टाकण्यात आली. या प्रयोगशाळेच्या इमारतीचं भूमिपूजन ही एक समाधानाची बाब असून, फेब्रुवारी **2027** पर्यंत, या इमारतीचं बांधकाम पूर्ण व्हावं अशी अपेक्षाही, त्यांनी व्यक्त केली.

राज्यसभा निवड

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी, ज्येष्ठ विधीज्ञ, उज्ज्वल निकम यांची राज्यसभेसाठी सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. निकम यांच्यासह समाजसेवक सी.सदानंदन मास्टर, माजी परराष्ट्र सचिव, हर्षवर्धन श्रृंगला, इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ, डॉ.मीनाक्षी जैन यांचीही नियुक्ती झाल्याची अधिसूचना, गृह मंत्रालयानं आज जारी केली. संविधानाच्या अनुच्छेद ८० अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करत राष्ट्रपतींनी ही नियुक्ती केली आहे. उज्ज्वल निकम यांनी मुंबईवर, दहशतवादी हल्ला प्रकरणात, सरकारी वकील म्हणून काम केलं होतं. सदानंद मास्टर हे केरळचे असून, त्यांनी शिक्षण क्षेत्रात, मोलाचं योगदान दिलं आहे. हर्षवर्धन श्रृंगला यांनी अमेरिका, बांग्लादेश आणि थायलंड इथं, भारताचे राजदूत म्हणून काम केलं आहे. तसंच ते, २०२३ मध्ये भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या **G-20** शिखर परिषदेचे मुख्य समन्वयक म्हणून कार्यरत होते. डॉ.मीनाक्षी जैन, या दिल्लीच्या गार्गी महाविद्यालयात, इतिहासाच्या सहयोगी प्राध्यापक असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, या चारही मान्यवरांचं, समाज माध्यमावरून अभिनंदन केलं आहे. उज्ज्वल निकम यांची कायद्याच्या क्षेत्रातली आणि संविधाना प्रती असलेली निष्ठा अनुकरणीय आहे. ते यशस्वी वकील असून, अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये न्याय मिळवून देण्यासाठी, आघाडीवर राहिले आहेत, अशा शब्दांत पंतप्रधानांनी निकम यांचं अभिनंदन केलं. उज्जवल निकम यांनी प्रतिक्रीया दिली.

*कि मेरा लोकसभा में डिफीट होना जिनको तकलीफ दुख हुआ था उस तकलीफ और दुख को आज हमारी राष्ट्रपति महोदया ने और प्रधानमंत्री जो पहली बार हमारे मोदी जी साहब पहली बार हमें मिले थे लोकसभा के कैम्पेन में, तब उन्होंने जो विश्वास मेरे कंधे पर हाथ रखकर बताया था, जताया था, उससे बहुत मैं भावुक हुआ था और जैसे ही कल उनका मुझे टेलीफोन आया और उन्होंने कहा, उज्वल जी, राष्ट्रपति महोदय आप पर एक जिम्मेदारी सौंपना चाहते हैं, क्या आप जिम्मेदारी ले सकते हैं? तो उन्होंने मुझे कहा कि हम राष्ट्रपति महोदया का ऐसा निर्णय है कि आपको राज्यसभा में लिया जाए ताकि देश के लिए, संविधान के लिए कुछ अपना शक्ति खर्च कर सके।*

खत वितरण

बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत, सर्व राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांनी, त्वरित कडक कारवाई करावी असे निर्देश, केंद्र सरकारनं दिले आहेत. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री, शिवराज सिंग चौहान यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना, पत्राद्वारे हे निर्देश दिले आहेत. देशभरात बनावट खतांचं वितरण, खतांचा काळा बाजार तसंच खतांच्या गोण्यांवर, खोटी लेबलं लावण्यासारख्या अवैध गोष्टींना, आळा घालायच्या उद्देशानं हे पत्र, कृषीमंत्र्यांनी लिहिलं आहे. कृषीक्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य यावं याकरता, त्यांना उत्तम दर्जाची खतं योग्य वेळी आणि रास्त भावात मिळणं गरजेचं आहे असं, चौहान यांनी म्हटलं आहे. त्यामुळे खतांचा पुरेसा साठा जागोजागी आणि गरजेच्या ठिकाणी उपलब्ध करून देणं, ही राज्य सरकारांची जबाबदारी असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. याकरता दोषी आढळलेल्यांचे खत वितरण परवाने रद्द करून, राज्य सरकारांनी गुन्हे दाखल करावेत असं, चौहान यांनी म्हटलं आहे.

सीसीटीव्ही कॅमेरे

प्रवासी कोचमध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवण्याच्या, पथदर्शी प्रकल्पाच्या सकारात्मक निकालांच्या आधारे, रेल्वेनं सर्व कोचमध्ये, सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेत, लक्षणीय सुधारणा होईल. दुष्ट आणि संघटित टोळ्या, भोळ्या प्रवाशांचा फायदा घेतात. कॅमेरे बसवल्यानं अशा घटनांमध्ये लक्षणीय घट होईल. प्रवाशांची गोपनीयता राखण्यासाठी, दरवाज्या जवळील सामान्य हालचाली क्षेत्रात, सीसीटीव्ही कॅमेरे

बसवले जातील. वाढीव सुरक्षेसाठी सर्व, ७४,००० कोचमध्ये आणि १५,००० लोकलमध्ये, सीसीटीव्ही कॅमेरे तसंच रेल्वेच्या प्रत्येक कोचमध्ये, चार सीसीटीव्ही कॅमेरे आणि सहा कॅमेरे असलेल्या लोकल मध्ये, सुसज्ज असणार आहेत. हे कॅमेरे १०० किमी प्रतितास पेक्षा जास्त वेगानं आणि कमी प्रकाशातही, उच्च दर्जाचं सीसीटीव्ही फुटेज, सुनिश्चित करणार आहे.

पृथ्वी प्रवास

भारतीय अंतराळवीर, शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास, उद्या सुरु होईल. ग्रुप कॅप्टन शुक्ला यांच्यासह, आणखी तीन अंतराळवीरांना घेऊन, ॲक्सियॉम-फोर हे, अंतराळ यान, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरुन, भारतीय प्रमाण वेळेनुसार, सायंकाळी साडेचार वाजता रवाना होईल. हे यान येत्या मंगळवारी, दुपारी तीनच्या सुमारास, पृथ्वीवर उतरेल. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री, डॉ.जितेंद्र सिंग यांनी समाज माध्यमावर ही माहिती दिली. शुभांशु शुक्ला यांनी, भारतासाठी अंतराळात एकूण सात प्रयोग केले आहेत.

सातबारा कोरा यात्रा

यवतमाळ इथं प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख, माजी आमदार बच्चू कडू यांची, सातबारा कोरा यात्रा सुरू आहे. यात्रेच्या आज सातव्या दिवशी, बच्चू कडू आणि पदयात्रेत सहभागी शेतकरी, शेतमजुरांनी, डोळ्यावर काळ्या पट्ट्या बांधून सहभाग नोंदवला. शेतकरी, दिव्यांग, भोई, मेंढपाळ यांच्या वरच्या अन्यायाकडे राज्य शासनाचं लक्ष वेधण्यासाठी ही यात्रा काढण्यात आली असल्याचं, बच्चू कडू यांनी सांगितलं.

क्रिकेट

क्रिकेटमध्ये यजमान इंग्लंडनं आज लॉर्ड्स इथं सुरू असलेल्या, अँडरसन तेंडुलकर, ट्रॉफीच्या तिसऱ्या कसोटी सामन्याच्या, चौथ्या दिवशी, भारता विरुद्ध आपला दुसरा डाव पुन्हा सुरू केला. काही वेळापूर्वी यजमान संघ चार गडी बाद ९८ धावांवर होता. काल तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा, इंग्लंडनं बिनबाद दोन धावा केल्या होत्या. भारताचा पहिला डाव ३८७ धावांवर संपल्यानं त्यांच्याकडे आता 98 धावांची आघाडी आहे, ज्यामुळे इंग्लंडच्या पहिल्या डावातील ३८७ धावांची बरोबरी झाली आहे. पाच सामन्यांची कसोटी मालिका सध्या १-१ अशी बरोबरीत आहे. दरम्यान काल भारताच्या महिला क्रिकेट संघानं इंग्लंड विरुद्धची

टी-ट्वेंटी मालिका तीन-दोन अशा फरकानं जिंकून, ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. महिला क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्ध भारताचा हा पहिलाच टी-ट्वेंटी मालिका विजय आहे. काल बर्मिंगहॅम इथं झालेला मालिकेतला पाचवा अंतिम सामना इंग्लंडच्या महिला संघानं पाच गडी राखून जिंकला.

विम्बल्डन टेनिस स्पर्धा

विम्बल्डन टेनिस स्पर्धेचा अंतिम सामना आज, अग्रमानांकित, जेनिक सिन्नर आणि दोन वेळचा गतविजेता, कार्लोस अल्काराझ यांच्यात रंगणार आहे. फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतही, अजिंक्यपदासाठी अंतिम लढत, या दोघात झाली होती. तेव्हा अल्काराझ हिरवळीवरच्या खेळातही वर्चस्व सिद्ध करणार की, सिन्नर फ्रेंच स्पर्धेतल्या पराभवाचा वचपा काढणार याबद्दल टेनिस प्रेमींमधे, उत्सुकता आहे. हा सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सुरू होईल.

हवामान

प्रादेशिक हवामान विभागानं पुढील तीन तासांकरिता विदर्भातील, बुलढाणा, अकोला, अमरावती, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये, काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविली आहे.

*****